एम. गवणावर होते. या उपक्रमांतर्गत देवचंद महाविद्यालयातील सायबर

सांगितले.

यांच्या
झाला.
यांनी
विद्यार्थी
रांच्या
देऊन

केरी,
केरी,
टील,
कुमारी
निधी
कुंभार
ळ व
वालन

सौंदलगा : विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा जनजागृती विषयी माहिती देताना प्रणोती सुतार, योगिता निकाडे व शिक्षक.

मराठी मुलांच्या शाळेत सायबर सुरक्षा कार्यक्रम

सौंदलगा, ता. १३ : येथील सरकारी उच्च प्राथमिक मराठी मुलांच्या शाळेत मंगळवारी (ता. ११) सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रम झाला. विद्यार्थ्यांना इंटरनेटचा सुरक्षित वापर, सोशल मीडियावरील सावधगिरी, ऑनलाईन फसवणुकीपासून बचाव करण्याबाबत प्रणोती सुतार, योगिता निकाडे यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना इंटरनेटचा सुरक्षित वापर करताना घ्यावयाची काळजी, सोशल मीडियावर वैयक्तिक माहिती शेअर न करणे, ऑनलाईन फसवणुकीपासून बचाव करण्याचे उपाय, दैनंदिन माहितीची गोपनीयता जपण्याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमास मुख्याध्यापक एम. एम. पाटील यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.